| MHKO070001302003 | नि.दि.दावा क्र.४०/२००३ | इब्राहीम पिंजारी<br>वि.<br>मिरासाब पिंजारी वगैरे |
|---|---|---|

## नि.क्र.१६९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने सी.पी.सी.चे ऑर्डर ६ रूल १७ व कलम १५१ प्रमाणे नि.क्र.१२६ चे अर्जात दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात कथन केले आहे की, सदरचा दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादी नं.५ मौला अब्दुल नदाफ उर्फ पिंजारी हे मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी नं.५ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी वादी यांनी नि.क्र.१२६ ला अर्ज दिला होता. त्यामध्ये प्रतिवादी नं.५ चे वारसांचे नांवामध्ये दुरुस्ती करणे वादीस भाग पडले आहे. त्यामुळे सदर अर्जातील कलम ४अ ते ४क मध्ये नमुद प्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेविषयी विनंती वादी यांनी केलेली आहे. सदरची दुरुस्ती ही महत्वाची असून सदर वारसांचेवर राईट टू सूट सर्व्हाइव्ह होत असलेने व नावावरुन पुढे कोणतीही तांत्रीक अडचण राहू नये म्हणून सदर दुरुस्ती होणे अत्यावश्यक व न्यायाचे आहे. सदरची दुरुस्ती केल्याने प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान होणार नाही अथवा अर्जाचे स्वरुपातही काही बदल होणार नाही. सबब, वादी यांनी अर्ज मंजुर करणेविषयी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.५ चे वारसांतर्फे वकीलांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे सदर अर्जावरच नोंदवून कथन केले आहे की, वादींनी जाणीवपुर्वक चुकीची नांवे नमुद करुन वारस रेकॉर्डवर घेतले आहे. मयत प्रतिवादी नं.५ व वादी हे एकमेकांचे नात्यातील आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादी नं.५ च्या वारसांची नांवे नव्याने वारस म्हणून दुरुस्त करता येणार नाहीत. वादींचा अर्ज हा सि.पी.सी. ६ x १७ प्रमाणे आहे. त्यामुळे दाव्यात दुरुस्ती नसल्याने दाव्याच्या टायटलमध्ये दुरुस्ती मागत असल्याने अर्ज मंजूर करता येत नाही. सबब, अर्ज रद्द व्हावा व मंजूर करणेचा

झालेस रु.५०००/– कॉस्ट प्रतिवादी नं.५ चे वारसांना देणेविषयी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे. इतर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे त्यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला. युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी हे मागितलेली सुचित दुरुस्ती मिळण्यास पात्र आहेत काय? | होय |
| २. | काय आदेश? | अंतिम आदेशान्वये |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्या क्र. १ करिता</u>**

५. वादीने प्रस्तुतचा दावा वाटप व मनाईसाठी दाखल केलेला आहे. **स्टेट ऑफ आंध्रप्रदेश आणि इतर वि. मे. पायोनियर बिल्डर्स आंध्रप्रदेश, ए.आय.आर.२००७–एस.सी. ११३** या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वाद कथनामध्ये उदारपणे दुरुस्ती करण्याचा मुख्य उद्देश हा निरनिराळे दावे टाळणे असल्याचे मत नोंदवलेले आहे. वादींची प्रस्तावित दुरुस्ती पाहता ती केवळ तांत्रीक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्या अनुषंगाने बदल केल्यास दाव्यातील दोन्ही पक्षकारांना कोणतेही नुकसान होणार नसल्याचे दिसून येते.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व १५३ वाचले. वादींची प्रस्तावित दुरुस्तीची मागणी मान्य केल्यास प्रतिवादींना अडचणीचे ठरणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींना काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी हे कुठल्याही प्रकारे नविन केस मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख–या वादाच्या मुद्दयावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या निष्कर्षापर्यंत मी

येत आहे. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यासाठी केलेला विलंब पाहता सदर वादीवर अर्ज खर्च ठेवल्यास उद्देश सफल होईल या निष्कर्षास मी येत आहे. अर्ज खर्च हा दाव्याची सध्याची स्थिती, लागलेला उशिर यावर ठरवणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा सारासार विचार करता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादींचा अर्ज रक्कम रु.२००/– खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी सदर खर्च हा सदर प्रतिवादींना पुढील तारखेस किंवा त्याच्या आत द्यावा.

३. वादींनी सदर खर्च दिल्यानंतर प्रस्तावित दुरुस्ती करावी.

४. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.02.05 17:46:16 +0530

(अ.त्रिं.मनगिरे)

दिनांक ०५/०२/२०२५

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
जयसिंगपूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 05/02/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 05/02/2025. |
| Judgment/order uploaded on | 05/02/2025. |